॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. १२ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

✲ सुविचार ✲

नशीब प्रत्येकाला संधी देतं,
पण मेहनतच नशिब बदलते.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### तुलना

दोघांचेही कार्य उत्तुंग
तुलनाच करता कशाला
एकमेकांना नावे ठेवून
कोरड आणता घशाला
अपयश आले की फोडू
पुन्हा त्यांच्यावरच खापर
प्रतिमाहनन करण्यासाठी
सत्तेचा नको ना वापर

# मान्सूनचा आठवड्यापासून जागीच मुक्काम

## तीन-चार दिवसात पुढे सरकण्याचा अंदाज । उष्णतेत प्रचंड वाढ

● **नवी दिल्ली । वीरभूमी -**

मान्सूनने केरळमध्ये ४ जून रोजी हजेरी लावली होती. त्यानंतर ६ जूनपर्यंत तो पाच राज्यांमध्ये पुढे सरकला. आता गेल्या ७ दिवसांपासून तो तामिळनाडूतील चेन्नई, महाराष्ट्रातील हर्णे आणि बंगालमधील सिलीगुडी येथे थांबला आहे.

मात्र, पुढील तीन दिवसांत तो वेगाने पुढे सरकण्याचा अंदाज आहे. लवकरच मान्सून महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशच्या उर्वरित भागांना व्यापेल. गुजरात वगळता इतर सर्व राज्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा परिणाम आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, दिल्ली, पश्चिम बंगालमध्ये पाऊस झाला. यूपीच्या चित्रकूटमध्ये ४.५ कोटी रुपयांच्या सभागृहाचे छत उडून गेले. इटावा, सीतापूर आणि फिरोजाबादमध्ये अपघातात ३ लोकांचा मृत्यू झाला.

सोसाट्याच्या वाऱ्यामुळे झाडे, टीनशेड आणि गेट पडल्याने अनेक ठिकाणी नुकसान झाले. तर,



पंजाबमधील मानसामध्ये जोरदार वादळात लोखंडी गेट पडल्याने ९ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. राजस्थानच्या अनेक भागांत वादळी वारे वाहिले. दिल्लीत खराब हवामानामुळे २ विमाने जयपूरला वळवण्यात आली. गुरूवारी २२ राज्यांमध्ये जोरदार पावसाचा अलर्ट आहे. यामध्ये राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, छत्तीसगड, ओडिशा, दिल्ली, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू-काश्मीर, पश्चिम बंगाल, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गोवा यांचा समावेश आहे. तर गुजरात वगळता इतर सर्व राज्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट आहे.

### ८ राज्यांमध्ये पारा ४० अंश पेक्षा जास्त

■ पावसाळा असूनही, यूपी, दिल्ली, राजस्थान, एमपी, महाराष्ट्र, गुजरात, पंजाब आणि हरियाणातील अनेक शहरांमध्ये पारा ४० अंशापेक्षा जास्त राहिला. देशात सर्वाधिक पारा पंजाबमधील भटिंडा येथे नोंदवला गेला. येथे पारा ४६.२ अंश होता. तर, राजस्थानमधील श्रीगंगानगरमध्ये पारा ४५.९ अंश, यूपीमधील बांदा येथे ४५.४ अंश, महाराष्ट्रातील ब्रम्हपुरी येथे ४५.५ अंश नोंदवला गेला.

## SPOT NEWS

### भारत-बांगलादेश सीमेवर तणाव

● **नवी दिल्ली** - मेघालयमध्ये भारत-बांगलादेश सीमेवर एका ५५ वर्षीय बांगलादेशी नागरिकाच्या घुसखोरीवरून सीमा सुरक्षा दल आणि आणि बॉर्डर गार्ड बांग्लादेश आमनेसामने आल्याचे समोर आले आहे. याचा व्हीडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सती राजबंशी (वय ५५, रा. राजशाही, बांगलादेश) असे या व्यक्तीचे नाव असून त्याने मेघालयाच्या दक्षिण-पश्चिम गारो हिल्स जिल्ह्यातील महेंद्रगंजजवळील नंदीरचार सीमेवरून भारतात बेकायदेशीर प्रवेश केला होता. घुसखोरीच्या संशयावरून बीएसएफने त्याला ताब्यात घेतले. बीएसएफने नियमानुसार त्याला पुन्हा बांगलादेशच्या हद्दीत पाठवण्याचा प्रयत्न केला. मात्र, बांगलादेशच्या सैनिकांनी तो भारतीय नागरिक असल्याचा दावा करत त्याला स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला. यावरून दोन्ही देशांच्या जवानांमध्ये जोरदार वाद झाला.

### नोकरीसाठी गेलेले २० भारतीय रशियात अडकले

● **मॉस्को** - फिश पॅकिंग आणि टेलरिंगची नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली गुजरातमधून ३३ लोकांना रशियाला पाठवले. रशियात नोकरी करण्यासाठी दीड ते दोन लाख पगार मिळेल असे आमिष दाखवले, परंतु रशियात गेल्यानंतर त्यांना केवळ १० हजार रुपये पगार दिला गेला. फसवणूक झाल्याने या सर्वांना पुन्हा भारतात यायचे आहे, परंतु परत येण्याचा मार्ग खडतर झाला आहे.

## इराणचा भीषण क्षेपणास्त्र हल्ला

● **तेहरान -**

आखातातील तणाव शिगेला पोहोचला असून अमेरिका आणि इराणमध्ये पुन्हा एकदा युद्ध पेटले आहे. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणही पेटून उठला असून जॉर्डनमधील अमेरिकन लष्करी तळांवर भीषण क्षेपणास्त्र हल्ले करत आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) जॉर्डनमधील अमेरिकेच्या अल-अझराक हवाई तळाला लक्ष्य करत त्यावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा मारा केला आहे.

या भीषण हल्ल्यात अमेरिकेची अत्याधुनिक एफ-३५, एफ-१५ आणि एफ-१६ फायटर जेट्स तसेच लष्करी कमांड सेंटर उद्ध्वस्त केल्याचा दावा इराणने केला आहे. इराणच्या आयआरजीसीने जॉर्डनमधील अमेरिकेच्या मुख्य हवाई तळावर एकापाठोपाठ एक १२ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. अमेरिकेने काही दिवसांपूर्वी इराणमधील करज, नजरबाद आणि पिशवा येथील औद्योगिक व लष्करी तळांवर जे हल्ले केले होते. त्याचा बदला घेण्यासाठीच थेट अमेरिकन लढाऊ विमानांना लक्ष्य करण्यात आल्याचे इराणने अधिकृत पत्रकात म्हटले आहे.

इराणने केलेल्या भीषण हल्ल्यानंतर अमेरिकेने आपल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने पावले उचलली आहेत. बगदादमधील अमेरिकन दूतावासाने इराकमध्ये राहणाऱ्या सर्व अमेरिकन नागरिकांना हाय अलर्टवर राहण्यास आणि कोणतीही वाट न पाहता तात्काळ इराक सोडण्यास सांगितले आहे. कोणत्याही क्षणी हवाई क्षेत्र बंद होऊ शकते किंवा विमानांची उड्डाणे रद्द होऊ शकतात, अशी चेतावणी देण्यात आली आहे. अमेरिकेने इराकसाठी 'लेव्हल ४' ही सर्वात कडक ट्रॅव्हल ॲडव्हायझरी लागू केली आहे.

इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या या युद्धाची धग आता शेजारील देशांनाही बसू लागली आहे. कुवेतने आपल्या सुरक्षेचा हवाला देत संपूर्ण हवाई क्षेत्र तात्काळ प्रभावाने बंद केले आहे. कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर नुकताच इराणचा थेट क्षेपणास्त्र हल्ला झाला होत. या हल्ल्यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून डझनभर लोक जखमी झाले आहेत. त्यामुळे हवाई क्षेत्र पूर्णपणे बंद केले असून आकाशात घिरट्या घालणारी अनेक व्यावसायिक विमाने आता इतर देशांतील सुरक्षित विमानतळांकडे वळवण्यात आली आहेत.

## फळबाग उत्पादक सहकारी संस्थांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत समावेश करावा : आ. आशुतोष काळे

● **कोपरगाव । वीरभूमी -**



आर्थिक अडचणीत असलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महायुती शासनाने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी करण्याचा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मात्र या कर्जमाफीचा फायदा कोपरगाव मतदार संघातील काही फळबाग उत्पादक सहकारी संस्थांना होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत कोपरगाव मतदार संघातील राहिलेल्या सर्व फळबाग उत्पादक सहकारी संस्थांचा समावेश करावा अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रयजी भरणे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात आमदार आशुतोष काळे यांनी असे म्हटले आहे की, कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील विविध फळबाग फलोद्यान व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासद संस्था असून त्या नियमितपणे पीक कर्ज व कृषी कर्जाचा लाभ घेत आहेत. सदर संस्था व त्यांचे सभासद शेती व्यवसायावर पूर्णता अवलंबून असून कृषी उत्पादन वाढीसाठी तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी या सर्व संस्था महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. यापूर्वी शासनाच्या कर्जमाफी योजनांमध्ये अशा स्वरूपाच्या संस्थांचा समावेश करण्यात आलेला होता.

मात्र पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजने अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीमध्ये कोपरगाव मतदार संघातील पात्र संस्थांचा समावेश झालेला नसल्यामुळे संबंधित सभासद, शेतकरी यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळणार नाही व त्यांच्या आर्थिक अडचणी वाढणार आहेत. या सर्व संस्था जिल्हा बँकेकडून कर्ज घेऊन त्यांची नियमित परतफेड करणाऱ्या संस्था असून शासनाने त्यांच्याकडे विशेष बाब म्हणून सकारात्मक दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राहिलेल्या या सर्व संस्थांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत समावेश करावा अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी कृषिमंत्री नामदार दत्तात्रयजी भरणे यांना दिलेल्या निवेदनात केलेली आहे.

# औरंगापूर फाट्याजवळ दुचाकीवरील स्फोट; एक जण गंभीर जखमी

## जिलेटीनच्या स्फोटामुळे अकोले तालुक्यात खळबळ । बॉम्ब शोध व नाशपथकासह फॉरेन्सिक पथकाकडून तपास

● **अकोले । वीरभूमी -**

अकोले-राजूर मार्गावरील औरंगापूर फाट्याजवळ दुचाकीवरील स्फोटक पदार्थांचा भीषण स्फोट होऊन एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे अकोले तालुक्यात एकच खळबळ उडाली असून स्फोटाच्या तीव्रतेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या दिलीप उत्तम ताजणे (रा. औरंगापूर, ता. अकोले) यांच्यावर अकोले येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, दिलीप ताजणे हे दुचाकीवरून स्फोटक पदार्थ घेऊन जात असताना औरंगापूर फाट्याजवळ अचानक तीव्र स्फोट झाला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की संबंधित दुचाकी सुमारे ५० फूट उंच हवेत उडाली. त्यानंतर हवेतच आणखी एक मोठा स्फोट झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर परिसरात धुराचे लोट पसरले असून आजूबाजूचे नागरिक भयभीत झाले होते.

घटनेची माहिती मिळताच अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. स्फोटाचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक येथील बॉम्ब शोध व नाशपथक तसेच फॉरेन्सिक विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने पाचारण करण्यात आले. संबंधित पथकांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून तपासासाठी आवश्यक नमुने संकलित केले आहेत.

स्फोटक पदार्थ नेमके कुठून आणण्यात आले होते, त्यामध्ये कोणत्या रासायनिक पदार्थांचा वापर करण्यात आला होता आणि या प्रकरणामागे अन्य कोणाचा सहभाग आहे का, या सर्व बाबींचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची



प्रक्रिया सुरू असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

> दुचाकीवरून जात असलेल्या दिलीप उत्तम ताजणे यांच्या ताब्यातील स्फोटक पदार्थांचा अचानक स्फोट झाला असून ते गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक तपासानुसार, सदर व्यक्ती या स्फोटक पदार्थांचा वापर बेकायदेशीररीत्या मासेमारीसाठी करत असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या अनुषंगाने अधिक तपास सुरू आहे.
>
> **- डॉ. कुणाल सोनवणे,**
> उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर


वीरभूमी

## SPOT NEWS

### डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांची जलशक्ती मंत्रालयाच्या हिंदी सल्लागार समितीवर निवड

**● शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव येथील न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



पुरुषोत्तम कुंदे यांची भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या हिंदी सल्लागार समितीवर सदस्य म्हणून निवड झाली आहे. या समितीचे अध्यक्ष केंद्रीय जलशक्ती मंत्री तर उपाध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री असतात. तसेच लोकसभेचे चार आणि राज्यसभेचे दोन खासदार, संबंधित खात्याचे सचिव, अपर सचिव व सहसचिव हेही समितीचे सदस्य असतात. याशिवाय हिंदी भाषेतील तज्ज्ञ व्यक्तींची सदस्य म्हणून निवड करण्यात येते. या समितीच्या माध्यमातून संबंधित मंत्रालयाच्या कार्यक्षेत्रात हिंदी भाषेचा अधिकाधिक वापर, त्यासंबंधीच्या सूचना तसेच विविध बाबींवर मार्गदर्शन केले जाते. डॉ. कुंदे यांना अध्यापन, संशोधन, प्रशासन आदी क्षेत्रांतील १८ वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशे, आ. नंदकुमार झावरे पाटील, डॉ. चंद्रकांत मोरे, सीताराम खिलारी, जयंतराव वाघ आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

### आयुष्मान व महात्मा फुले योजनेंतर्गत रुग्णालयांचे सामाजिक लेखापरीक्षण करा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

केंद्र सरकारची आयुष्मान भारत योजना आणि राज्य शासनाची महात्मा फुले जनआरोग्य योजना या गरीब, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मोफत व सुलभ आरोग्यसेवा मिळावी या उद्देशाने राबविल्या जात आहेत. या योजनांसाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. त्याचप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांनाही शासनाकडून विविध करसवलती, जागा, अनुदाने व इतर सुविधा पुरविल्या जातात. त्यामुळे अशा रुग्णालयांनी सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य नागरिकांना न्याय्य सेवा देणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक रुग्णांकडून येणाऱ्या तक्रारी लक्षात घेता अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व आयुष्मान भारत, महात्मा फुले जनआरोग्य योजना मान्यताप्राप्त तसेच धर्मादाय रुग्णालयांचे स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण (सोशल ऑडिट) करण्यात यावे, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले. कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत ही संघटना कचरा वेचक, असंघटित कामगार, महिला, वृद्ध आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी कार्यरत असून, शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे की नाही, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संघटनेने दिलेल्या निवेदनात अनेक गंभीर बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. आयुष्मान भारत किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे कार्ड असतानाही काही रुग्णांना उपचार नाकारले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अनेक वेळा हा आजार योजनेत समाविष्ट नाही असे तोंडी सांगितले जाते; मात्र त्याबाबत कोणतेही लेखी कारण दिले जात नाही. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

## पाथर्डी-शेवगावच्या पाणीप्रश्नाच्या कायमस्वरूपी समाधानासाठी

# आ. मोनिका राजळे यांची धरणावर जाऊन पाहणी

### जायकवाडी धरणावरील जॅकवेल व अप्रोच ब्रिजच्या कामांचा घेतला आढावा । कामे जलद पूर्ण करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

**● शेवगाव । वीरभूमी –**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत पाथर्डी व शेवगाव नगर परिषदांच्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेची कामे वेगाने पूर्ण व्हावीत, यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी थेट जायकवाडी धरणावर जाऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. या वेळी जॅकवेल आणि अप्रोच ब्रिज या अत्यंत महत्त्वाच्या कामांचा सविस्तर आढावा घेत संबंधित कंत्राटदार, सल्लागार संस्था, मुख्याधिकारी व अधिकाऱ्यांना कामांची गती वाढवून ती निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



पाथर्डी आणि शेवगाव शहरांतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांना वर्षभर शुद्ध आणि अखंडित पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे हेच आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे आमदार मोनिका राजळे यांनी यावेळी स्पष्ट केले. भविष्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी आधुनिक आणि सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

जायकवाडी धरणातून उभारण्यात येणारी ही पाणीपुरवठा योजना दोन्ही शहरांसाठी जीवनदायी ठरणार असून, नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून भेडसावत असलेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात मात करण्यास हातभार लागणार आहे.

कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसून, नागरिकांच्या अपेक्षांनुसार योजना वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचेही आमदार राजळे यांनी नमूद केले. संबंधित यंत्रणांनी समन्वय राखून कामांना अधिक गती द्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी पाथर्डी नगर परिषदेचे नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगलताई कोकाटे, नगरसेवक, शेवगाव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे, पाथर्डी पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, दोन्ही योजनांच्या कंत्राटदारांचे प्रतिनिधी, सल्लागार संस्था तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

> पाथर्डी आणि शेवगाव शहरांना भविष्यात पाण्यासाठी संघर्ष करावा लागू नये, यासाठी आधुनिक आणि दीर्घकालीन पाणीपुरवठा व्यवस्था उभारणे हीच आमची प्राथमिकता आहे. नागरिकांना अखंडित आणि शुद्ध पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक कामाचा सातत्याने आढावा घेतला जात आहे.
>
> **– आ. मोनिका राजळे,**
> शेवगाव–पाथर्डी

### ‘तोटा झाला तरी चालेल; तालुक्याची कामधेनू असलेला अगस्ती साखर कारखाना सुरूच ठेवा’

**● अकोले । वीरभूमी–**

तालुक्याची कामधेनू मानल्या जाणाऱ्या अगस्ती सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम २०२६-२७ सुरू करण्याच्या दृष्टीने तसेच कारखान्यासमोरील विविध अडचणींवर चर्चा करण्यासाठी मंगळवारी संचालक मंडळ आणि तालुक्यातील सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची सहविचार बैठक पार पडली. यावेळी, तोटा झाला तरी चालेल; मात्र तालुक्याच्या हितासाठी अगस्ती साखर कारखाना सुरूच ठेवावा, असा एकमुखी सूर उपस्थितांमधून उमटला.

कारखान्याचे अध्यक्ष सिताराम गायकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत आगामी गळीत हंगामाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रारंभी अध्यक्ष गायकर यांनी मागील गळीत हंगामाचा आढावा घेत आगामी हंगामासंदर्भातील नियोजनाची माहिती दिली.

तालुक्याच्या कार्यक्षेत्रात किमान पाच लाख मेट्रिक टन ऊस उत्पादन झाल्यास कारखान्यावरील आर्थिक संकट कायमचे दूर होऊ शकते. यासाठी ऊस लागवड वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सध्या उसाची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असून राज्यातील सर्वच साखर कारखाने गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले. ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, कामगार आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या सहकार्याने कारखाना सुरू ठेवण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

ज्येष्ठ नेते मधुकर नवले यांनी कारखान्यावरील बँक कर्जाचा बोजा फार मोठा नसल्याचे सांगत, आर्थिक भार कमी करण्यासाठी तांत्रिक बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची गरज व्यक्त केली. पूर्वी कारखान्यांना राज्यस्तरावर अधिक आधार मिळत होता, मात्र सध्याची परिस्थिती वेगळी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### सरकारी कांदा खरेदीत पुन्हा घोटाळ्याची शक्यता खरेदी प्रक्रिया बदलावी अथवा योजना बंद करावी : अनिल घनवट

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात कांद्याचे भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन केंद्र शासनाने मूल्य स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यात दोन लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट ठेवले आहे. मात्र या खरेदी प्रक्रियेत मोठा घोटाळा होण्याची शक्यता असल्याचा आरोप स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी केला आहे. सरकारने कांदा खरेदीची पद्धत तातडीने बदलावी अथवा सरकारी कांदा खरेदी बंद करावी, अशी मागणी त्यांनी केंद्र शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.



सरकारकडून १५८० रुपये प्रतिक्विंटल दराने कांदा खरेदी केली जाणार असून भ्रष्टाचार टाळण्यासाठी बाजार समित्यांमधून थेट खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोमवारपासून खरेदी प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात बाजार समित्यांमध्ये खरेदी होत नसल्याचा दावा घनवट यांनी केला आहे.

सध्याच्या प्रक्रियेनुसार नोंदणीकृत शेतकऱ्यांना बाजार समितीतील गाळ्यावर कांदा आणावा लागणार असून त्यानंतर छाटणी व प्रतवारी करून नाफेडच्या निकषांमध्ये बसणारा कांदाच स्वीकारला जाणार आहे. नाकारलेला कांदा शेतकऱ्यांनाच परत न्यावा लागणार आहे. ही प्रक्रिया अत्यंत किचकट असून त्याऐवजी नाफेडने थेट लिलावात सहभागी होऊन कांदा खरेदी करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राहावी यासाठी संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्ही निगराणीखाली व्हावी, तसेच प्रत्येक बाजार समितीत नाफेडसाठी खरेदी झालेल्या कांद्याची आणि केंद्रीय वखार महामंडळाकडे जमा झालेल्या साठ्याची माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

मंगळवारी केंद्रीय वखार महामंडळाकडून ४५.२६ टन कांदा साठा असल्याची माहिती देण्यात आली. मात्र त्या दिवशी कोणत्याही बाजार समितीत प्रत्यक्ष खरेदी झाली नसताना हा कांदा आला कोठून, असा सवालही घनवट यांनी उपस्थित केला आहे. व्यापाऱ्यांकडून स्वस्तात खरेदी केलेला कांदा सरकारला जास्त दराने विकण्याचा प्रकार होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, नाफेडला अपेक्षित असलेल्या दर्जाच्या कांद्याला सध्या बाजारातच १५८० रुपयांपेक्षा अधिक दर मिळत असल्याने कमी गुणवत्तेच्या कांद्याला हमीभाव देण्याची खरी गरज असल्याचे घनवट यांनी नमूद केले. अन्यथा सरकारी कांदा खरेदी योजना बंद करण्याची मागणी त्यांनी ग्राहक व्यवहार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे केली आहे.

# शिक्षण केवळ नोकरीसाठी नव्हे, तर संस्कारांसाठीही असले पाहिजे

### पद्मश्री पोपटराव पवार । राळेगणसिद्धी येथे राज्यस्तरीय शिक्षण हक्क परिषद

**● पारनेर । वीरभूमी –**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधून विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच नव्हे, तर संस्कार आणि जीवन जगण्याची कला मिळत आहे. मात्र, नव्या शैक्षणिक धोरणामुळे अनेक प्राथमिक शाळांचे भवितव्य अंधकारमय बनले असून गावागावांतील जिल्हा परिषद शाळा टिकल्या तरच गावचे गावपण, संस्कार आणि संस्कृती टिकून राहील, असे मत पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केले.

राळेगणसिद्धी येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने गुरुवारी आयोजित राज्यस्तरीय शिक्षण हक्क परिषद व राज्यस्तरीय महामंडळ सभेत ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य नेते संभाजीराव थोरात, राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे, उपनेते रावसाहेब रोहोकले, राष्ट्रीय शिक्षक महासंघाचे नेते बाळासाहेब झावरे, राष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष आबासाहेब जगताप, जिल्हाध्यक्ष प्रविण ठुबे, राजेश हिवाळे, बाळकृष्ण तांबारे, मच्छिंद्रनाथ मोरे, किशन इदगे, सचिन डिंबळे, स्वाती शिंदे, डॉ. संजय कळमकर, संजय शेळके, रामराव निकम, रावसाहेब सुंबे, बळवंत पाटील, राजकुमार साळवे, जिल्हाध्यक्ष सुरेश निवडुंगे, शिक्षक बँक संचालक सूर्यकांत काळे, तालुका नेते सुनील दुधाडे, तालुकाध्यक्ष युवराज हिलाळ, मंडळ तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर इंगळे, रघुनाथ झावरे आदी पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

यावेळी बोलताना पद्मश्री पवार म्हणाले की, शिक्षण हे उद्याच्या राष्ट्राचे भवितव्य आहे. शिक्षकांच्या टीईटी, संचमान्यता, पदोन्नती, बीएलओ कामे, ऑनलाइन कामे यांसारख्या प्रलंबित प्रश्नांसाठी तसेच न्यायलढ्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे तसेच शिक्षण व ग्रामविकास विभागाच्या सचिवांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

दिवसेंदिवस सामाजिक परिस्थिती बदलत असून गावातील संस्कार व सांस्कृतिक वातावरणातही बदल होत असल्याची खंत व्यक्त करताना ते म्हणाले, पूर्वी गावाच्या जडणघडणीत शिक्षकांचे मोठे योगदान होते. सामाजिक आणि जीवनविषयक समस्या अभ्यासक्रमाचा भाग झाल्यास विद्यार्थ्यांना जीवन जगण्याची कला आत्मसात करता येईल. सध्या शिक्षण आणि अभ्यासक्रम केवळ आर्थिक पॅकेजच्या दृष्टीने केंद्रित होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

गाव आणि अनुभवातून शिक्षण मिळणे आवश्यक असून पर्यावरण, पाणी आणि सामाजिक मूल्यांपेक्षा आर्थिक लाभ असलेल्या अभ्यासक्रमांना प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार या गावांच्या विकासामध्ये शिक्षकांचे मोठे योगदान असल्याचे सांगत त्यांनी प्राथमिक शाळांमधून संस्कार आणि जीवनमूल्ये जोपासली जात असल्याचे अधोरेखित केले.

एक वर्षात शिक्षकांच्या पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून, तो न सुटल्यास राज्याचा शालेय शिक्षण विभाग बंद पाडण्याचा



इशारा राज्य नेते संभाजीराव थोरात यांनी दिला.

ते म्हणाले, शिक्षकांना निवडणूक, बीएलओ, राष्ट्रीय जनगणना आणि इतर अशैक्षणिक कामे करावी लागत आहेत. कोरोना काळात अधिकारी घरात आणि शिक्षक रस्त्यावर अशी परिस्थिती होती. संचमान्यतेबाबत न्यायालयीन निकाल विरोधात गेला असला, तरी आता सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाणार आहे. टीईटीला शिक्षक घाबरत नाहीत, मात्र इतर अधिकाऱ्यांसाठी परीक्षा का नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे म्हणाले, सरकारी शाळा वाचल्या पाहिजेत आणि शेतकरी व गोरगरीबांची मुले शिक्षणापासून वंचित राहता कामा नयेत. टीईटी, पदोन्नती आणि इतर प्रश्नांवर कायदेशीर लढ्यासाठी ११ ते १३ सदस्यांची स्वतंत्र कायदेशीर समिती स्थापन करण्यात येणार आहे. जुनी पेन्शन योजनेबाबत सरकारने संवेदनशील भूमिका घ्यावी. शिक्षण दिनापर्यंत प्रलंबित प्रश्न सुटले नाहीत, तर शिक्षक दिन आक्रोश दिन म्हणून साजरा करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी चार ठराव, कार्यकारिणीतील फेरबदल तसेच नवीन कार्यकारिणी स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष प्रविण ठुबे यांनी केले, तर आभार मंगेश खिलारी यांनी मानले.

SPOT NEWS

## कर्नाटकच्या धर्तीवर महाराष्ट्रातही एससी उपवर्गीकरणाची गरज : ॲड. अमित थोरात

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

कर्नाटक सरकारने अनुसूचित जाती (एससी) आरक्षणामध्ये उपवर्गीकरण लागू करून सामाजिक न्यायाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मान्यतेनंतर कर्नाटकमध्ये एससी आरक्षणाचे अंतर्गत विभाजन करण्यात आले असून, विविध उपजातींना त्यांच्या लोकसंख्या व मागासलेपणाच्या आधारे स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हे उपवर्गीकरण काळाची गरज असल्याची भावना सामाजिक न्याय अभ्यासक ॲड. अमित थोरात यांनी व्यक्त केली. ॲड. अमित थोरात यांनी सांगितले की, आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातींतील सर्व घटकांपर्यंत समानपणे पोहोचणे आवश्यक आहे. काही जातींनाच सातत्याने लाभ मिळत असेल आणि इतर समाज घटक मागे राहत असतील तर सामाजिक न्यायाचा मूळ हेतू साध्य होत नाही. कर्नाटक सरकारने अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये अंतर्गत वर्गीकरण करून विविध गटांना स्वतंत्र वाटा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या निर्णयासाठी कायदेशीर आणि घटनात्मक आधार तयार करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ॲड. थोरात पुढे म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये मातंग, चर्मकार, ढोर, खाटीक, मेहतर तसेच इतर अनेक अनुसूचित जातींच्या समाजांकडून दीर्घकाळापासून उपवर्गीकरणाची मागणी होत आहे. राज्य शासनाने जातीवार शैक्षणिक, सामाजिक व नोकरीतील प्रतिनिधित्वाचा अभ्यास करून वास्तव परिस्थिती समोर आणावी. त्यानंतर सर्व घटकांना न्याय देणारे धोरण आखण्याची मागणी त्यांनी केली आहे. आरक्षणावरील हक्क कमी करणे हा उपवर्गीकरणाचा उद्देश नसून आरक्षणाचा लाभ सर्वात वंचित घटकांपर्यंत पोहोचविणे हा त्यामागील मूलभूत हेतू आहे. सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कर्नाटकच्या मॉडेलचा अभ्यास करून आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी देखील त्यांनी केली.

## प्रभाग क्र. २ मधील परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : नगरसेविका त्रंबके

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक २ मध्ये नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त संदेशनगर व परिसरातील चौक सुशोभीकरण,श्रीराम चौक ते वसंत टेकडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पेव्हिंग ब्लॉक बसवून सुशोभीकरण अशा विविध विकास कामाचा शुभारंभ नगरसेविका रोशनी ताई त्रंबके यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या विकासकामामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. या प्रसंगी नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, विनीत पाऊलबुधे, आकाश त्र्यंबके, सुजाता शिंदे,सुरेखा बनकर, राजश्री पिंपळे, भास्कर चेमटे,किशोर वाणे,महेश टाक, गोरक्षनाथ आव्हाड, वैभव पोकळे, विद्याधर कुलकर्णी, प्रकाश कलंके, दत्तात्रय जरे, कृष्णा आंधळे धीरज उकिरडे, देविदास गुडा, अमर मेटू, विकी करोलिया सचिन लोटके तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अण्णा हजारे यांच्या देशसेवेचा गौरव

# राळेगणसिद्धीला ‘टी-५५’ रणगाड्याची मानाची भेट

**भारतीय संरक्षण मंत्रालयाकडून सन्मान । महाराष्ट्रातील असा लष्करी गौरव मिळविणारे राळेगणसिद्धी ठरले पहिले गाव**

**पारनेर । वीरभूमी–**

ज्येष्ठ समाजसेवक आणि माजी सैनिक अण्णासाहेब हजारे यांच्या राष्ट्रसेवा आणि सामाजिक कार्याचा गौरव म्हणून भारतीय संरक्षण मंत्रालय आणि भारतीय सैन्याच्या वतीने राळेगणसिद्धी गावाला ऐतिहासिक ‘टी–५५’ रणगाडा कायमस्वरूपी भेट देण्यात आला आहे. महाराष्ट्रात असा लष्करी सन्मान प्राप्त करणारे राळेगणसिद्धी हे पहिले गाव ठरल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



हा रणगाडा केवळ युद्धसामग्री नसून भारतीय सैन्याच्या शौर्य, पराक्रम आणि बलिदानाचे प्रतीक मानला जातो. १९७१ च्या भारत–पाकिस्तान युद्धात तसेच बांगलादेश मुक्ती संग्रामात ‘टी–५५’ रणगाड्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. विशेष म्हणजे, अण्णा हजारे भारतीय सैन्यात कार्यरत असताना त्यांनी याच प्रकारच्या रणगाड्यांचा वापर केला होता. त्यामुळे या भेटीमुळे त्यांच्या लष्करी कारकिर्दीच्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला आहे.

हा रणगाडा राळेगणसिद्धी येथे स्थापित करण्यासाठी गेल्या वर्षभरापासून प्रशासकीय आणि कायदेशीर पातळीवर प्रयत्न सुरू होते. जिल्हा व सत्र न्यायालयाचे नोडल अधिकारी चंद्रकांत शिंदे यांनी या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्यासह लेफ्टनंट जनरल आर. आर. निंबोरकर (निवृत्त) आणि दादा पठारे यांनी संरक्षण मंत्रालय आणि सैन्य प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधला. अनेक तांत्रिक आणि कायदेशीर अडचणींवर मात करत या तिघांच्या प्रयत्नांतून हा ऐतिहासिक उपक्रम यशस्वी झाला.

हा रणगाडा गावातील प्रमुख ठिकाणी स्थापित करण्यात येणार असून, राळेगणसिद्धीला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी तसेच भावी पिढ्यांसाठी तो राष्ट्रभक्ती, शिस्त आणि भारतीय सैन्याबद्दलचा आदर जागविणारे प्रेरणास्थान ठरणार आहे.

> भारतीय सैन्याने माझ्या देशसेवेचा आणि सामाजिक कार्याचा सन्मान या रणगाड्याच्या भेटीच्या माध्यमातून केला आहे. याचा मला अभिमान वाटतो. हा रणगाडा युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि सैन्याबद्दल आदर निर्माण करेल.
>
> – **अण्णासाहेब हजारे**, ज्येष्ठ समाजसेवक

राळेगणसिद्धीच्या इतिहासातील हा एक महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद क्षण मानला जात असून, या उपक्रमासाठी चंद्रकांत शिंदे, लेफ्टनंट जनरल आर. आर. निंबोरकर आणि दादा पठारे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## आ. आशुतोष काळेंच्या मागणीला यश; गोदावरी कालव्यांना उन्हाळी अंतिम आवर्तन मिळणार

**कोपरगाव । वीरभूमी–**

यंदाच्या तीव्र उष्णतेचा फटका फळबागा, चारा पिके व ऊस शेतीला बसू नये यासाठी गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे अंतिम आवर्तन सोडावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्या मागणीला जलसंपदा मंत्र्यांनी हिरवा कंदील दिला असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

मंगळवार पासून गोदावरी कालव्यांना बिगर सिंचनाचे आवर्तन सोडण्यात आले असून या आवर्तना नंतर लगेचच सिंचनासाठी उन्हाळी अंतिम आवर्तन सोडण्यात येणार आहे. यामुळे लाभक्षेत्रातील पाण्यासाठी तहानलेल्या फळबागा, चारा पिके आणि ऊस शेतीला फायदा होणार आहे. चालू वर्षी उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लाभ क्षेत्रातील विहिरी आणि बोअरवेलची पाणी पातळी खोलवर गेल्याने गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रात उभ्या असलेल्या बारमाही पिकांचे भवितव्य धोक्यात आले होते. पिकांना पुरेसे पाणी देणे शक्य नसल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या. गंगापूर धरणातून गोदावरी कालव्यांना मिळणारे हक्काचे ०१ टीएमसी पाणी, तसेच १.८ टीएमसी क्षमता असलेल्या गौतमी–गोदावरी जलाशयातून आणि वालदेवी धरणातूनही कालव्यांसाठी पाण्याचा एक थेंबही सोडण्यात आला नसल्याने धरण समूहात आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असून सिंचनाचे आवर्तन देणे सहज शक्य असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी जलसंपदा मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. व उन्हाची तीव्रता पाहता शेतकऱ्यांच्या वाढलेल्या चिंता दुर करण्यासाठी गोदावरी कालव्यांना सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी लावून धरली होती. अखेर त्या मागणीची दखल घेवून राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाटबंधारे विभागाला गोदावरी कालव्यांना सिंचनासाठी आवर्तन सोडण्याबाबत निर्देश दिले आहेत.

## दुर्गम आदिवासी भागातील एलपीजी ग्राहकांच्या अडचणी सोडवाव्यात : आ. डॉ. किरण लहामटे

**अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील एलपीजी ग्राहकांना गॅस सिलेंडर मिळविताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी आमदार डॉ. किरण लहामटे यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगन भुजबळ यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघ हा दुर्गम आदिवासी भाग असून येथील ग्राहकांना एलपीजी सिलेंडर मिळविताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दुर्गम भागात मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसणे तसेच अनेक आदिवासी नागरिक नियमित मोबाईल रिचार्ज करत नसल्यामुळे डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (डीएसी) प्राप्त होत नाही. त्यामुळे सिलेंडर वितरण प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

याशिवाय अकोले मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने मोबाईल टॉवर आणि अखंडित वीजपुरवठ्यावर परिणाम होऊन डीएसी कोड मिळविण्यात आणखी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, हरसूल आणि इतर दुर्गम भागांप्रमाणे अकोले मतदारसंघातील सर्व गॅस वितरकांना २० ते ३० टक्के वितरण डीएसी कोडशिवाय करण्यास शिथिलता देण्यात यावी, अशी मागणी आ. डॉ. लहामटे यांनी केली आहे.

सध्या गॅस सिलेंडर बुकिंगचा कालावधी ४५ दिवसांचा असून तो कमी करून २५ दिवस करण्यात यावा, अशीही त्यांनी मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांना इंधनासाठी पुन्हा लाकडांचा वापर करावा लागेल आणि त्यामुळे वृक्षतोडीचे प्रमाण वाढण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

तसेच आधार कार्ड वेळेत ऑनलाइन अद्ययावत न झाल्यामुळे अनेक उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांचे दोन वेगवेगळे आधार क्रमांक तयार झाले आहेत. परिणामी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने नवीन आधार क्रमांक गॅस कंपन्यांच्या सॉफ्टवेअरमध्ये अद्ययावत करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंतीवजा मागणी आ. डॉ. किरण लहामटे यांनी ना. छगन भुजबळ यांच्याकडे केली आहे.

# पारनेर तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती

**जनावरांच्या चारा-पाण्यासाठी मनसे आक्रमक । चारा डेपो, चारा छावण्या व पाणीटँकर सुरू करण्याची मागणी**

**पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यात पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असतानाच जनावरांच्या चारा आणि पाण्याचाही तीव्र तुटवडा जाणवू लागल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तहसीलदार गायत्री सैंदाणे यांना निवेदन देऊन तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. मान्सूनचे उशिरा आगमन आणि पावसाच्या खंडामुळे पिके हाताशी आली नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. अशा परिस्थितीत दुभत्या व शेतीसाठी आवश्यक असलेल्या जनावरांचे संगोपन कसे करायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. पाणीटंचाईमुळे जनावरांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ लागल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दोन महत्त्वाच्या मागण्या प्रशासनाकडे केल्या आहेत. ज्या गावांमध्ये जनावरांच्या चाऱ्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई आहे, त्या ठिकाणी तातडीने चारा डेपो सुरू करावेत. तसेच गरज भासल्यास जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय ज्या भागांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, त्या ठिकाणी प्रशासनाने तत्काळ पाणीटँकर सुरू करून जनावरांना वेळेवर पाणी उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी मनसे तालुकाध्यक्ष अविनाश पवार म्हणाले, शासनाने तातडीने या परिस्थितीची दखल घेऊन चारा आणि पाण्याची उपलब्धता करावी. वेळेत ठोस निर्णय न घेतल्यास पशुधन वाचविण्यासाठी शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येईल. या संकटाच्या काळात महाराष्ट्र नवनिर्माण सेना शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून, मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

यावेळी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र गाडगे, तालुका सचिव नारायण नरवडे, तालुका उपाध्यक्ष विरेंद्र थोरात, पारनेर शहराध्यक्ष सतीश म्हस्के, सुपा शहराध्यक्ष अक्षय सूर्यवंशी, बाबूभैय्या कोठावळे, सूरज गोरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




दरम्यान, तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता प्रशासन या निवेदनाची कितपत दखल घेते आणि कोणत्या उपाययोजना राबविते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# थेरगावच्या प्राचीन श्री नागेश्वर मंदिरात मराठाकालीन शिलालेखाचा शोध

## सात गावांच्या सामूहिक जीर्णोद्धाराचा दुर्मीळ पुरावा | इ.स. १७४४ मधील शिलालेखातून जोशी-कुलकर्णी वतनव्यवस्था, बहुग्रामीय प्रशासनाचे वास्तव उजागर

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा | वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील थेरगाव येथील नाग नदीकाठी वसलेल्या प्राचीन श्री नागेश्वर महादेव मंदिरामध्ये मराठाकालीन इतिहासाचा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज स्वरूपातील शिलालेख आढळून आला आहे. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावर तीन वेगवेगळ्या भागांत कोरलेला हा शिलालेख देवनागरी लिपीतील मराठी भाषेत असून तो एकूण १४ ओळींचा आहे. सदर लेख उठाव स्वरूपात कोरलेला आहे.

अनेक वर्षांच्या वातावरणीय परिणामामुळे तसेच वारंवार झालेल्या रंगरंगोटीमुळे शिलालेखावरील अक्षरे झिजून विद्रूप झाली असून काही ठिकाणी अक्षरे तुटून गहाळ झाली आहेत. मात्र, शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर प्रयत्नपूर्वक वाचण्यात यश आले.

***शिलालेखाचे वाचन***

1. ***श्री शंकर प्रसन्न***
2. ***श्री मोरेश्वर प्रसन्न***
3. ***सके सोळासे १६६६***
4. ***रक्ताक्षि नाम संवत्सरे***
5. ***अश्विन शुद्ध प्रतिपदा***
6. ***माणको अनंत यकबोट कुलकर***
7. ***णी व जोशि मौजे थेरगाव तरफ मांडोग***
8. ***ण व मौजे चांदे हे सात मौजे खांडवी***



9. ***रवळगाव कोकणगाव***
10. ***मौजे थेटे सांगवि मौजे चिंचोली***
11. ***मौजे मांडळी येक मौजे नागमठाणें***
12. ***सदरहू गावे व जोशी व कुलकरणी***
13. ***यानि श्री नागनाथचे देवाळय जीर्ण***
14. ***उद्धार केला असे***

या शिलालेखाचे संशोधन राजेश पोपट इंगळे यांनी केले असून शिलालेखाचे वाचन अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

**शिलालेखाचा अर्थ**

श्री शंकर भगवान आणि श्री मोरेश्वर गणपती यांच्या कृपेने शालिवाहन शक १६६६, रक्ताक्षी नाम संवत्सर, अश्विन शुद्ध प्रतिपदा, म्हणजेच दि. २५ सप्टेंबर १७४४, सोमवार, घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर मांडवगण तर्फेतील मौजे थेरगावचे जोशी व कुलकर्णी माणको अनंत एकबोटे तसेच चांदे, खांडवी, रवळगाव, कोकणगाव, थेटे सांगवी, चिंचोली, मांडळी आणि नागमठाणे या गावांतील ग्रामस्थ व संबंधित गावांचे जोशी-कुलकर्णी यांनी एकत्र येऊन श्री नागनाथ अर्थात नागेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला.

**सात गावांच्या सामूहिक सहभागाचे दुर्मीळ उदाहरण**

मराठाकालीन इतिहासामध्ये मंदिर उभारणी, दुरुस्ती किंवा जीर्णोद्धारासाठी अनेक राजे, सरदार किंवा स्थानिक वतनदारांनी मदत केल्याचे उल्लेख आढळतात. मात्र, एकाच वेळी सात गावांनी एकत्र येऊन मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा स्पष्ट उल्लेख असलेला शिलालेख अत्यंत दुर्मीळ मानला जातो. त्यामुळे थेरगावचा हा शिलालेख सामाजिक एकात्मता, धार्मिक समर्पण आणि सामूहिक जबाबदारी यांचे जिवंत प्रतीक ठरतो.

या पुराव्यामुळे मराठाकालीन ग्रामव्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण आणि जिवंत पुरावा प्रकाशात आला आहे.



या शिलालेखात जोशी आणि कुलकर्णी या वतनदार पदांचा उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. कुलकर्णी हे गावच्या महसूल व लेखन व्यवस्थेचे प्रमुख अधिकारी होते, तर जोशी हे धार्मिक कार्य, पंचांग आणि शुभमुहूर्त यांचे मार्गदर्शन करणारे अधिकारी मानले जात. या दोन्ही वतनदारांनी धार्मिक कार्यात पुढाकार घेतल्याचे या लेखावरून स्पष्ट होते.

शिलालेखात उल्लेखिलेल्या गावांवरून तत्कालीन बहुग्रामीय प्रशासनाची रचना, अधिकारक्षेत्र आणि सामाजिक परस्परसंबंध स्पष्ट होतात. खांडवी, रवळगाव, कोकणगाव, थेटे सांगवी, चिंचोली, मांडळी आणि नागमठाणे या गावांचा एकत्रित सहभाग हा त्या काळातील ग्रामीण समाजरचनेच्या अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ठरतो.

**मंदिर संवर्धनाची ऐतिहासिक परंपरा**

शिलालेखात स्पष्टपणे श्री नागनाथचे देवालय जीर्णोद्धार केला असा उल्लेख असल्याने हा लेख मंदिराच्या पुनर्बांधणीचा समकालीन पुरावा ठरतो. यावरून मंदिरांचे जतन व संवर्धन ही केवळ राजसत्तेची जबाबदारी नसून स्थानिक समाज, वतनदार आणि ग्रामस्थ यांचीही सामूहिक जबाबदारी होती, हे अधोरेखित होते.

घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर हे कार्य पार पडल्याने तत्कालीन धार्मिक श्रद्धा, शुभाशुभ संकल्पना आणि सामाजिक परंपरांचेही दर्शन घडते.

**स्थानिक इतिहासासाठी मौल्यवान स्रोत**

शिलालेखात आलेली व्यक्तिनावे, गावांची नावे, वतनपदे, प्रशासकीय विभाग आणि धार्मिक उल्लेख यांमुळे हा लेख स्थानिक इतिहास, भूगोल, वतनदारी व्यवस्था, सामाजिक जीवन आणि मराठाकालीन सांस्कृतिक परंपरेच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचा व विश्वासार्ह प्राथमिक स्रोत मानला जातो.

थेरगावचा हा शिलालेख मराठाकालीन मंदिरसंवर्धन, शैव श्रद्धा, ग्रामव्यवस्था, बहुग्रामीय प्रशासन आणि लोकसहभाग यांचा इतिहास उजागर करणारा मौल्यवान दस्तऐवज आहे. अठराव्या शतकातील ग्रामीण महाराष्ट्राचे सामाजिक, धार्मिक आणि प्रशासकीय वास्तव या शिलालेखातून प्रभावीपणे समोर येते.

> थेरगावचा हा शिलालेख मराठाकालीन मंदिरसंवर्धन, शैव श्रद्धा, जोशी–कुलकर्णी वतनव्यवस्था, बहुग्रामीय प्रशासन आणि स्थानिक समाजाच्या धार्मिक सहभागाचा अत्यंत महत्त्वपूर्ण पुरावा आहे. मंदिराच्या जीर्णोद्धाराची नोंद करण्याबरोबरच तो अठराव्या शतकातील ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि प्रशासकीय जीवनाचे वास्तव चित्र आपल्या समोर उभे करतो.
>
> – **अनिल दुधाणे**, शिलालेख वाचक, पुणे

**संशोधन कार्यात सहकार्य**

सदर शिलालेख संशोधन कार्यात शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचालित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे राजेश इंगळे, दिगंबर भुजबळ, प्रा. कानिफ उगले, सरपंच अनिल शिंदे, माजी सरपंच मिनीनाथ शिंदे, रवींद्र महानवर, गोरख शिंदे, युवक नेते किरण शिंदे, आबुनाना नन्नवरे आणि ग्रामविकास अधिकारी महेश जगताप यांचे सहकार्य लाभले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विक्रमाबद्दल श्रीक्षेत्र मढी येथे आ. मोनिका राजळे यांच्या हस्ते विशेष महाआरती

● **पाथर्डी | वीरभूमी–**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग ४,३९९ दिवस (१२ वर्षे) अखंडित सेवा, सुशासन आणि जनकल्याणकारी कार्य करत सर्वाधिक काळ देशाचे पंतप्रधानपद भूषविल्याबद्दल श्री क्षेत्र मढी येथे भाजपा आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते श्री चैतन्य कानिफनाथ महाराज संजीवन समाधी मंदिरात विशेष महाआरती करण्यात आली.

पाथर्डी तालुका भाजपाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या विक्रमानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते श्री चैतन्य कानिफनाथ महाराज संजीवन समाधी मंदिरात विशेष महाआरती करण्यात आली. तसेच श्री क्षेत्र मढी येथील श्रीराम चौकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचे फलक लावण्यात आले.



यावेळी पेढे वाटप, फटाक्यांची आतषबाजी तसेच तोफांच्या सलामीद्वारे आनंदोत्सव साजरा करण्यात आला. जोरदार घोषणाबाजी करत भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली वाजतगाजत मिरवणुकीने श्री चैतन्य कानिफनाथ गडावर दाखल झाले.

यावेळी बोलताना आमदार मोनिका राजळे म्हणाल्या, की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या मंत्राच्या आधारे देशाला विकासाच्या नव्या उंचीवर नेले आहे. सेवा, सुशासन, गरीब कल्याण, आत्मनिर्भर भारत आणि जनसक्षमीकरण या सूत्रांचा अवलंब करून त्यांनी नागरिकांचा शासनावरील विश्वास अधिक दृढ केला आहे. 'लखपती दीदी' अभियान तसेच चार कोटींहून अधिक गरीब कुटुंबांना पक्की घरे उपलब्ध करून देण्यासारख्या योजनांमुळे देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, पुरुषोत्तम आठरे, धनंजय बडे, भगवान मरकड, मृत्युंजय गर्जे, नगरसेवक नंदकुमार शेळके, अमोल गर्जे, अजिनाथ मोरे, काकासाहेब शिंदे, शिवाजी मोहिते, मनिषा उदमले, प्रतिक नांगरे, बंडूशेठ बोरुडे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष संदीप पठाडे, काशीबाई गोल्हार, स्मिता लाढ, ज्योती शर्मा, सचिन वायकर, सुनील परदेशी, नवनाथ मरकड, संभाजी मरकड, भाऊसाहेब जनार्दन मरकड, विष्णू श्रीराम मरकड, किरण मरकड, जनार्दन मरकड, कुंडलिक मरकड, पांडुरंग मरकड, रवींद्र आरोळे, सोमनाथ अकोलकर, देवस्थानचे अध्यक्ष विठ्ठल मरकड, विश्वस्त दादासाहेब मरकड, अनिल साठे यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक उपस्थित होते.

# निघोज परिसरातील वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी पोलिस गस्त सुरू करण्याची पोलीस प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

● **निघोज | वीरभूमी–**

गेल्या दीड महिन्यापासून निघोज व परिसरात छोट्या-मोठ्या चोऱ्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, या प्रकारांकडे पोलिसांकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत निघोज व्यापारी असोसिएशन, निघोज ग्रुप ग्रामपंचायत, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, शिवबा संघटना, मुंबईकर मंडळ तसेच ग्रामस्थांच्या वतीने पोलिस गस्त सुरू करण्याची मागणी पोलीस उपनिरीक्षक नितीन खंडागळे यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आले.

यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, उपाध्यक्ष राजेंद्र लाळगे, शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, पसायदान सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर, निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, मळगंगा ग्रामीण विकास



ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, रोहिदास लामखडे, व्यापारी असोसिएशनचे सहसचिव दत्तात्रय चौधरी, मिलिंद ढवळे, महेंद्र पांढरकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, सुमारे २५ हजार लोकसंख्या असलेल्या निघोज गावात येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींची नियमित नोंद ठेवणे आवश्यक आहे. निघोज पोलीस दूरक्षेत्रात पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत अपुरी असून किमान चार अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची गरज आहे. या दूरक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात ४० हून अधिक गावे येत असून, केवळ चार ते पाच कर्मचाऱ्यांवर संपूर्ण जबाबदारी असल्याने पोलिसांवर ताण वाढत आहे.

गेल्या महिन्यात रात्रीबरोबरच दिवसाढवळ्या झालेल्या चोऱ्यांमुळे चार ते पाच कुटुंबांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. या घटनांचा तातडीने तपास करून संबंधित चोरट्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात अशा घटनांमध्ये घट होण्यास मदत होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. रात्रीच्या वेळी होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी पोलिसांनी विशेष गस्त सुरू करावी. विशेषतः रात्री १ ते पहाटे ४ या वेळेत नियमित गस्त घालण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# कर्जमाफीच्या जाचक अटींविरोधात २३ जूनला सर्वपक्षीय व शेतकरी संघटनांचे आंदोलन

● **पारनेर | वीरभूमी–**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कृषी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, तसेच शेतकरी हिताच्या विविध मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा २३ जून रोजी पारनेर तालुक्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शेतकरी, सामाजिक आणि सर्वपक्षीय संघटनांनी दिला आहे.

यासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी गुरुवारी तहसीलदार गायत्री सैंदाणे यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे निवेदन सादर केले. या निवेदनात कर्जमाफी योजनेतील विविध अटींमुळे मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात जाहीर करण्यात आलेल्या योजनेत अनेक निर्बंध घालण्यात आल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात सन २०१९ मधील कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच एकवेळ समझोता योजनेतील मर्यादा हटविणे, १२ लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांवरील अटी रद्द करणे, प्रोत्साहनपर अनुदानासाठी असलेली सलग दोन वर्षे नियमित कर्जफेडीची अट हटविणे, पीकविमा योजनेतील जाचक ट्रिगर अटी रद्द करणे आणि खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांचे पुनर्गठन करण्याच्या मागण्यांचाही समावेश आहे. याशिवाय पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजी गॅसच्या वाढत्या दरांमध्ये कपात करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याची मागणीही करण्यात आली आहे.



दरम्यान, पारनेर तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत शेतकरी प्रश्नांवर विविध पक्ष व संघटनांचे प्रतिनिधी एकवटल्याचे चित्र पाहायला मिळाले. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २३ जून रोजी पारनेर तालुक्यातील प्रमुख रस्ते बंद करून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. पारनेर तालुक्यासह राज्यातील विविध भागांत मागण्या मान्य होईपर्यंत लोकशाही मार्गाने टप्प्याटप्प्याने आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे खा. नीलेश लंके यांनी स्पष्ट केले.